**म.कौ.हिं.सं.का.अ.क्र.५/२०२४**
**रुबिना खान वि. अरबाज खान**
**<u>नि.क्र.२४ च्या पुढे</u>.**

**<u>अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.१ रुबिना खान हिचा उलटतपास जाबदेणारतर्फे श्री.व्यवहारे, विधीज्ञ यांचेमार्फत शपथेवर सुरु –</u>**

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नासाठी चार ते पाच लाख रूपये जाबदेणार याने खर्च केले. मी नांदायला जाबदेणाराकडे गेली. हे म्हणणे खरे नाही की, लग्नानंतर मी आठ दिवसातच जाबदेणार यांना शारिरीक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, मी घरातील कामे वेळोवेळी करत नव्हते व स्वयंपाक व्यवस्थीत करत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणार यांना अपमानकारक वागणूक देत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणार यांनी समजावून सांगूनही ऐकत नव्हते व त्यांना त्रास देत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदत असताना ति–हाईत इसमाबरोबर रात्री अपरात्री फोनवर बोलत होते व वॉट्सअॅप चॅट करत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणारांनी माझेकडे विचारणा केली असता उत्तरे देण्यास टाळाटाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणाराला ति–हाईत इसमाबरोबर चॅटींग करत असताना प्रत्यक्ष सापडले. हे म्हणणे खरे नाही की, ति–हाईत इसमाने मला स्नॅप चॅटद्वारे अश्लील व्हीडीओ पाठविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणार यांचा मानसिक छळ केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वागण्यात बदल करत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणालाही न सांगता माहेरी निघून गेले व जाते वेळी एक तोळे सोने घेवून गेले. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार यांनी मला नांदवण्यासाठी खूप प्रयत्न केले. मी जाबदेणार यांना नोटीस पाठविली. जाबदेणाराने नोटीसला उत्तर पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, मी नोटीस पाठवूनही नांदायला तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नांदायला तयार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.१३/०९/२०२४ रोजी जाबदेणार क्र.१ याने पाठविलेला पहिला तलाख स्विकारला. हे म्हणणे खरे नाही की, दि.३०/०४/२०२४ रोजी मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे साक्षीदारासमक्ष मला दुसरा तलाख दिला व मी तो स्विकारला. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६/०५/२०२४ रोजी जाबदेणार याने मला इद्दत रक्कम पाठवून मला तिसरा तलाख दिला व तो मी स्विकारला. जाबदेणार क्र.३ व ४ यांचा विवाह झालेला आहे. फिरोज व रेश्मा हे आरबाज खान पासून वेगळे राहतात.

हे म्हणणे खरे नाही की, मी शिलाई मशीनचे काम करते. हे म्हणणे खरे नाही की, मला त्यापासून पाच ते सात हजार रूपये उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, मी जाबदेणाराचा स्वतःहून त्याग केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–
**( ए. बी. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे.

**दि.०९/१२/२०२५**